# PILGRIMAGE TO PANDHARPOOR.

# पंढरीचा वारकरी.



BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.
MARATHI Series. 2nd Edition.
2,000 Copies. A. D. 1891.

मुंबईमध्यें
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

सन १८९१.

*Price ¼ Anna.* किंमत पाव आणा.

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

# पंढरीचा वारकरी.

## भाग पहिला.

कोणी एक गृहस्थ कार्तिकमासीं पंढरपुरास गेला होता. तेथें कित्येक लोक चंद्रभागेच्या वाळवंटावर ज्ञानोबा तुकाराम, ज्ञानदेव तुकाराम, असें ह्मणून टाळ वाजवीत उभे होते, त्यांपाशीं हा गृहस्थ जाऊन ह्मणतो;–

**गृ०**–अहो बाबांनो, हें काय करितां?

**लो०**–विठोबाचें भजन करितों, महाराज!

**गृ०**–हें तर ज्ञानोबाचें भजन चाललें आहे. विठोबाला ह्याचा राग येणार नाहीं काय? तुकारामानें विठोबाचें भजन केलें आणि तुह्मी तुकारामाचें भजन करितां हें कसें? तुकाराम जर ह्या वेळीं एथें असता तर तो तुह्मास ह्मणता? त्याला हें तुमचें भजन आवडलें नसतें. त्य एक अभंग असा आहे कीं "भजन चाललें उफराटें ॥ कोण जाणे खरें खोटें ॥" त्याप्रमाणें तुह्मी करीत आहां.

**लो०**–तुकोबाचें नांव घेतलें ह्मणजे विठोबास पावतें.

तुकाराम जगद्गुरु होता. (पुनः भजन चालवितात.) ज्ञानदेव तुकाराम! ज्ञानोबा तुकाराम! ज्ञानदेव तुकाराम!

**गृ०**—दादांनो, इतके उतावळे होऊं नका. क्षणभर माझ्याशीं बोला. तुमचें भजन तर सारा दिवस चाललेंच आहे.

**लो०**—बोला, काय ह्मणतां?

**गृ०**—तुकाराम जगद्गुरु होता असें तुह्मी ह्मणतां, तर त्याच्या आज्ञेप्रमाणें तुह्मी कां चालत नाहीं? माझ्या नांवाचे भजन करा असें त्यानें कोठें सांगितलें आहे?

**लो०**—आह्मां अडाण्यांस तुमच्या एवढें शहाणपण नाहीं, आमचा भोळाभाव सिद्धीस जाव. (भजन) ज्ञानबा तुकाराम! ज्ञानोबा तुकाराम! तुकाराम! तुकाराम!

**गृ०**—तुकारामाची भक्ति इतकी आवडते तर तुह्मी पंढरीस कां येतां! देहूस जा, आणि रात्रंदिवस तेथेंच टाळ र बसा.

**लो०**—(एक धष्टपुष्ट मनुष्य पुढें होऊन मोठ्यानें बोलतो) अहो, आह्मी पंढरीचे वारकरी आहों. आणि तुह्मी सांगतां तसेंच विठोबाचें भजन करितों. ह्मणा लोकहो, पुंडलिकवरदा हरिविठ्ठल! (सर्व जण एकदम तसें ओरडून

ह्मणतात.) ह्मणा जय जय विठ्ठल! जय जय विठ्ठल! पांडुरंग हरि, सांवळ्या पांडुरंग हरि. (असें भजन ते सर्व करूं लागले.)

**गृ०**—ऐका, ऐका. मीं तुह्मास विठोबाचें भजन करायास सांगितलें नाहीं. मीं इतकेंच विचारलें कीं, पंढरीस येऊन तुकारामाचें नांव कां घेतां? आतां वारकरी बावा, तुह्मी ह्या दिंडीचे पुढारी आहां असें मला वाटतें. तर तुह्मी आपले टाळ घटकाभर बंद करून खालीं बसा, व ह्या सर्व लोकांसहि बसवा. मग आपण निवांतपणीं कांहीं बोलूं.

(ते सर्व खालीं बसतात.)

**वा०**—तुह्मी कोठून आलां?

**गृ०**—मी पुण्याहून आलों, पण मी तुह्मासारखा वारकरी नाहीं.

**वा०**—वारी सर्वांच्याच दैवीं कोठून असणार? हा पूर्वसंचितांचा ठेवा.

**गृ०**—तें कसेंही असो; पाहिजे तर त्याविषयीं पुढें बोलूं. पण आतां मला सांगा कीं, तुह्मी एथें कशाला आलां?

**वा०**—देवाचें दर्शन घ्यायाला.

**गृ०**–देवाचें ह्मणूं नका, विठोबाचें ह्मणा. विठोबानें तुह्माला बोलावणें पाठविलें होतें काय?

**वा०**–होय, बोलावणें अक्षयीचें आहे. विठोबा महाराज भक्तांकरितां एथें येऊन तिष्ठत उभे राहिले आहेत; आणखी दुसरें कसलें बोलावणें पाहिजे?

**गृ०**–विठोबा भक्तांकरितां एथें आला नाहीं, "पुंडलिका भेटी पांडुरंग आलेगा" असें वाक्य आहे.

**वा०**–बरें, मग पुंडलिक भक्त नव्हता काय?

**गृ०**–नाहीं; तो विठोबाचा भक्त नव्हता. तो आपल्या आईबापांचा भक्त होता. त्याला विठोबा माहीत होता असेंही वाटत नाहीं. जेव्हां त्याच्या दारापुढें विठोबा येऊन उभा राहिला तेव्हां त्यानें त्याचा आदर सत्कारही केला नाहीं. तो त्यास भेटायासही बाहेर आला नाहीं. आंतूनच त्यानें त्याला एक विट फेंकून दिल्ही. अशी कथा तुमच्या पोथींत आहे कीं नाहीं?

**वा०**–होय आहे. आणि पुंडलिकानें त्याला नाहीं सांगितलें कीं, विटेवर उभा राहून जे दर्शनास येतील त्यांस उद्धरीत जा? ह्मणूनच आह्मी एथें आलों.

**गृ०**–बरें तर तुह्मी घरीं राहून पुंडलिकाप्रमाणें आपल्या

मातापित्यांची सेवा कां कराना? मग तुमच्याही भेटीस विठोबा येईल. तुह्मी घरीं आपल्या आईबापांचा अपमान करितां, त्यांस शिव्या गाळी देतां, त्यांस निष्ठूर शब्दांनीं बोलतां, त्यांस धड अन्नवस्त्र देत नाहीं, त्यांच्याशीं खटला करून, जिनगीची वांटणी मागतां, त्यांजवर सरकारांत फिर्यादीस जातां आणि एथें विठोबापाशीं उद्धार मागायास येतां, तर तो तुह्मास कसा उद्धरील? आणि विठोबाला उद्धरायाची शक्ति कोठें आहे? तुमच्याच ग्रंथांत लिहिलें आहे कीं, कृष्ण रुक्मिणीच्या शोधार्थ फिरत फिरत या दिंडीरवनांत आला व थकून दमून कमरेवर हात ठेवून उभा राहिला.

**दुसरा वा०**—होय, राधेच्या नादीं आपले पति लागले ह्मणून रखुमाबाई रुसून गेल्या होत्या त्यांस पाहावयास कृष्ण देव एथें आले खरे, ही गोष्ट पुराणांत आहे.

**गृ०**—कृष्णाला देव ह्मणूं नये. जो आपली लग्नाची बायको टाकून परस्त्रीच्या नादीं लागतो, त्याला मनुष्यही ह्मणूं नये; तो पशु. आणि कृष्णासारख्या व्यभिचारी माणसाला देव कसें ह्मणतां? व्यभिचारी माणसाच्यानें तुमचा उद्धार कसा करवेल? मुळीं तोच पापी. तो तुमचें पाप कसें हरण करील?

वा०—सगळें जग एथें लोटलें आहे. तें उगेच का? पाप जातें ह्मणूनच कीं नाहीं?

गृ०—सगळें जग आपलें पाप घालविण्यासाठीं एथें आलें आहे हें कशावरून? ह्या यात्रेंत कोणी व्यापारी आहेत, ते लोकांस फसवायास व आपलां माल विकायास आले आहेत. दुसरे कोणी यात्रेची मौज पाहायास व नाना प्रकारचे पदार्थ विकत घ्यायास आले आहेत. कोणी आपल्या सख्या सोयऱ्यांच्या व इष्टमित्रांच्या सोबतीनें आले आहेत, कोणी भीक मागायास मिळाले आहेत, दुसरे सोदे लुच्चे लोक बदकमांसाठीं जमले आहेत, कोणी चोर भामटे व उचले आहेत, आणि कोणी बडव्यांच्या भूलथापीनें आले आहेत; बहुतेक तर जन जातें ह्मणून आपण जावें असा विचार करून आंधळ्याप्रमाणें येतात. पण खरोखर पाप घालविण्यासाठीं येणारे असे ह्या यात्रेंत थोडेच मिळतील. आणि मी तुह्मास दुसरें असें पुसतों कीं विठोबाच्या दर्शनानें पाप जातें हें कशावरून?

वा०—चंद्रभागेचें स्नान घडल्यावर पाप राहील काय?

गृ०—आतां तर तुह्मी भिमावळाचे भक्त झालां? विठोबास सोडलेंत काय? काय हा तुमचा खुंटावरच्या कावळ्यासारखा चंचल भाव अनेक ठिकाणीं नाचतो. मी तुमच्याशीं

बोलूं लागलों तेव्हां तुह्मी तुकारामाचें भजन करून पाप घालविण्याच्या उद्योगांत होतां. मग मीं प्रश्न केल्यावर विठोबाच्या भजनाचा कडाका चालविलात, आणि आतां ह्मणतां कीं चंद्रभागेच्या स्नानानें पाप जातें. चंद्रभागेच्यानें तुमचा पापमळ तर घालववत नाहीं, पण तुह्मीच आपल्या आंगाचा मळ तींत टाकून तिचें स्वच्छ पाणी मलीन करितां. तिच्यानें तुमचा पापरोग दूर करवत नाहीं, पण तिचें पाणी तुमच्या मळानें रोगी होतें. आणखी असें पाहा, कीं चंद्रभागेच्या स्नानानें पाप जातें तर मग तुह्मी एथेंच कशाला आलां? ही नदी एथून पुष्कळ लांबवर गेली आहे. तर जेथून ती तुमच्या गांवास जवळ असेल, तेथें जाऊन स्नान केलें तर चालणार नाहीं? अहो लोकहो, तुह्मी सर्व अंधळे आहां, तुह्माला खरा मार्ग ठाऊक नाहीं. तुह्मी मला ह्मणालां कीं पूर्वसंचिताशिवाय पंढरीची वारी घेतां येत नाहीं, पण मी खरोखर तुह्मास सांगतों कीं, ज्याच्या पदरीं अज्ञानाचा व भोळेपणाचा ठेवा आहे तोच वारकरी होतो.

**वा०**—तुह्मी कांहीं ह्मणा, आह्मास आमचा विठोबा खरा, त्याचें माहात्म्य मोठें ह्मणून आह्मी एथें आलों.

**गृ०**—विठोबाचें माहात्म्य कोणीं वाढविलें? हें सर्व ढोंग

आहे; विठोबा पहिल्यानें जैनांचा देव होता. नंतर ब्राह्मणांचें वळ चालूं लागल्यावर त्यांनीं त्याला त्यांपासून हिसकावून घेऊन आपला देव केला. आणि आतां ह्या बडव्यांनीं लोकांपासून पैसा उपटण्याकरितां त्याचें एवढें स्तोम वाढविलें. विठोबाच्या दर्शनानें लोकांचें कल्याण होतें असें बडव्यांस वाटतें, तर तें दर्शन त्यांनीं इतकें अवघड करून ठेविलें नसतें. परंतु त्यांचा सर्व मतलब लोकांस ठकवायाचा आहे. त्यांस लोककल्याणाची अगदीं काळजी नाहीं. पाहा दर्शनास जातांना हजारों लोकांची दाटी होऊन तेथें कित्येकांच्या हातापायांचा चुराडा होतो! कित्येक त्या गर्दींत ठार मरतात. ज्यांस दर्शन होतें ते घामाघूम होऊन आपला जीव बचावून मात्र त्या गचर्डींतून एकदांचे बाहेर पडतात. तरीं ह्या निर्दय बडव्यांनीं देवळास एकच द्वार ठेवून आपला अर्थ साधला आहे.* जे श्रीमंत आहेत त्यांजपासून पुष्कळ द्रव्य मिळविण्याची त्यांनीं अशी युक्ति काढली आहे कीं, त्यांच्यासाठीं ते पुजा बांधतात, ह्मणंजे जसा कोणी पैका देईल

---

* हें पुस्तक लिहिलें तेव्हां (सन १८६५) असेंच होतें. त्याच्या मागून सरकारानें एका सुधारलेल्या हिंदु डे० कलेक्टराच्या सूचनेवरून नवीन दारें वगैरे पाडलीं.

तसें विठोबास सजवून त्याच्या आंगावर डागडागिने घालतात. आणि गरीब बिचारा वारकरी तोब्यांखालीं बडविला जातो, पुष्कळ धक्या बुक्या खात जातो, अर्धमेला होतो तरी "घेतां विठ्ठलदर्शन दृष्टीस पडे कोरडा पाषाण," हेंच काय तें त्याच्या पदरीं पडतें. याप्रमाणें विठोबाचें माहात्म्य आहे.

अणखी दुसरें एक त्याचें माहात्म्य आहे. जत्रेच्या दिवसांत जरीमरीच्या योगानें शेंकडों मनुष्यें मरतात, लेंकरें उघडीं पडतात, बायका विधवा होतात; आणि ही जरीमरी यात्रा फुटली ह्मणजे गांवोगांव पसरून हजारों लोकांचा प्राण घेती. केवढें हें विठोबाचें माहात्म्य! जे लोक त्याच्या दर्शनास कष्टानें व भावार्थानें येतात त्यांची तो अशी दशा करितो. अशा यात्रा सरकार बंद करील तर किती बरें होईल! हजारों जणांचे जीव वांचतील.

एक वारीकरी ( रागावून ह्मणतो. ) एकूण तुमच्या बोलण्याप्रमाणें आह्मी व हें सगळें जग वेडें, तुह्मी काय ते शहाणे. तुमच्यापाशीं काय ज्ञानाची पुंजी आहे ती आह्मास दाखवा बरें ?

दुसरा वारकरी ( त्यास ह्मणतो. ) अरेरे, इतका तापून कां बोलतोस? ते दादा आपल्यास कांहीं वावगें सांगत

नाहींत. (गृहस्थाकडे वळून) दादा, त्याचें बोलणें जमेस धरूं नका. तुमची गोष्ट मला मानवली. तुह्मी कांहीं खोटें सांगत नाहीं. पण आह्मीं विठोबाला सोडून कोणाला भजावें? आमचे वाडवडील ह्याचीच भक्ति करीत आले. तशीच आह्मीही करितों.

**गृ०**—वाडवडिलांच्या चालीकडे पाहूं नये. धर्माच्या गोष्टींत ज्याचा त्यानें विचार करावा, व देवानें लावून दिल्हेला मार्ग शोधून त्या मार्गानें चालावें. तुह्मी जर मनापासून माझी गोष्ट ऐकत असलां, तर मी देवाच्या मार्गाची गोष्ट थोडक्यांत तुह्मास सांगतों.

**वा०**—होय, मी तर मनापासून तुमची गोष्ट ऐकायास कबूल आहें.

## भाग दुसरा.

**गृ०**—आतां आपण परमेश्वराची प्रार्थना करून एकचित्तानें त्याच्या मार्गाचा विचार करूं. (मग त्यानें ईश्वराची अशी प्रार्थना केली कीं, हे दयाळू देवा, आह्मा पाप्यांवर दया कर, आणि आपला खरा मार्ग आह्मास दाखीव.) आतां ऐका. खरा व जीवंत असा एकच परमेश्वर आहे. हें तुह्मी कबूल करितां?

**वा०**—होय महाराज. एकच परमेश्वर. त्याशिवाय दुसरा कोण आहे ?

**गृ०**—बरें तर विठोबा परमेश्वर नाहीं, व जीवंतही नाहीं. दगडाचा पुतळा, त्याला जीव कोठून ? आणि जरी तुह्मीं त्याला परमेश्वर मानिलें तरी त्याशीं भांडायाला दुसरे पुष्कळ आहेत.

**वा०**—हें कसें ? मी नीट समजलों नाहीं.

**गृ०**—ह्मणजे जसें तुह्मी विठोबास भगवान ह्मणतां तसें गांवोगांव जीं दुसरीं देवस्थानें आहेत त्यांसहि त्यांचे भक्त सर्वांहून थोर मानितात. परंतु त्यांतून खरोखर कोणीच थोर नाहीं. आतां दुसरी गोष्ट. जो खरा व जीवंत असा एकच परमेश्वर आहे तो परमपवित्र व न्यायी आहे. तुमचे सर्व कल्पित देव अपवित्र व अन्यायी आहेत. ज्यानें पाप व अन्याय केला नाहीं, असा एकही देव तुमच्यांत नाहीं. सर्व देवांत मुख्य मानलेले जे ब्रह्मा विष्णु व शिव तेच पाप्यांचे शिरोमणी आहेत, मग इतरांची काय कथा ?

**वा०**—आमचे देव पापी व आह्मी पापी. मग ते आह्मास शिक्षा करणार नाहींत. बरी वाईट बुद्धि देणारा तोच परमेश्वर.

**गृ०**—असें ह्मणूं नका. जरी खोट्या देवांच्यानें तुमचें

बरें व वाईट करवत नाहीं, तरी जो खरा देव आहे तो तुह्मास खचीत शासन करील. आणि तो कोणासही पापबुद्धि देत नाहीं.

**वा०**—तर मग आमचा सत्यनाश होईल.

**गृ०**—यांत काय संशय? परंतु जर तुह्मी पश्चात्ताप करून त्याकडे फिराल तर तो तुह्मास क्षमा करील.

**वा०**—त्यानें आह्मास तारावें ह्मणून आह्मीं काय केलें पाहिजे?

**गृ०**—तुह्माला कांहीं करायास नको. ह्मणजे जसें तुह्मी आतां दानधर्म, तीर्थयात्रा, उपासतापास, भजनपूजन करितां तसें तो कांहीं करायास सांगत नाहीं. हे सर्व व्यर्थ उपाय. तो तुह्मास सांगतो कीं, मी जें पुण्य देतों तें घ्या व पुण्यवान व्हा.

**वा०**—तें पुण्य आह्मीं कसें घ्यावें?

**गृ०**—देवानें जगावर एवढी प्रीति केली कीं, त्यानें आपला प्रिय पुत्र या जगांत पाठविला. त्यानें मनुष्यदेह धरून आह्माकरितां पुष्कळ दुःख सोशिलें. आमच्या पापांचा भार उचलला. आणि पापामुळें जें शासन, ह्मणजे मरण आह्मास भोगायाचें तें त्यानें स्वतः भोगिलें. आणि मरून उठून पुनः

तो जेथून आला तेथें ह्मणजे आकाशांत गेला. त्या तारणाराचें नांव येशू ख्रीस्त. त्याचें पुण्य अपार व अखंड आहे. तें जो कोणी विश्वास धरून मागतो त्याला देव देतो.

**वा०**—तें तुह्मासारख्यास मिळेल. आह्माला कोठून मिळणार?

**गृ०**—असें नाहीं. देवासमोर आपण सर्व सारखे पापी आहों. आणि येशूचें बोलावणें सर्वांस आहे. तो ह्मणतो, "अहो कष्टकरी व ओझ्यानें लादलेले, तुह्मी सर्व माझ्या जवळ या, ह्मणजे मी तुह्माला विसांवा देईन." विठोबा तुह्माला क्षणभर तरी विसांवा देतो काय?

**वा०**—कशाचा दादा विसांवा! हें पोट पाठीस लागलें आहे. आजचा दिवस गेला ह्मणजे उद्यांचा कसा जाईल अशी काळजी आहेच.

**गृ०**—मी तुमच्या पोटाची गोष्ट बोलत नाहीं, कुत्रें देखील पोट भरतें. जो मेहनत मजुरी करील तो उपाशीं मरणार नाहीं. परंतु तुमच्या आत्म्यास शांति आहे काय हें मी विचारतों. तुह्मी आतां वारकरी झालां ह्मणून तुमचे दुर्गुण व दुष्ट स्वभाव गेले काय? तुमच्या मनांत लोभ, हेवा, मत्सर, राग, कपट, वैर हीं आहेत कीं नाहींत? तुमच्या तोंडांतून शिवी

निघती कीं नाहीं? तुह्मी लबाडी सांगतां कीं नाहीं? जोंपर्यंत हीं पापें तुमच्यांत आहेत तोंपर्यंत तुह्माला शांति कोठून मिळणार?

**वा०**—तीं पापें कोठून जाणार? पाप जाईल तर ही काया सुवर्णाची होणार नाहीं? ह्या तर सांगायाच्या गोष्टी. आमचे मोठे साधु संत व शास्त्री पुराणिक आहेत त्यांचें पाप गेलें नाहीं; मग आमचें कुठून जाणार! कुत्र्याचें शेंपूट साहा महिने नळकंड्यांत घातलें तरी तें वांकडें तें वांकडेंच.

**गृ०**—मला वाटतें तुह्मी आतां धोरणावर नसाल. उपासानें व भजनानें तुमचें डोकें तर फिरलें नाहीं ना? मी तुह्माला बोलायाच्या गोष्टी सांगत नाहीं. त्या गोष्टी ते बुवा तेथें ब्रह्मज्ञान सांगतात त्यांपाशीं आहेत. माझ्या गोष्टी खऱ्या अनुभवाच्या आहेत. जो येशू ख्रीस्तावर पूर्ण विश्वास ठेवितो त्याच्या सर्व अन्यायांची क्षमा होते, व देव त्याला आपला पवित्र आत्मा देतो मग त्याचें मन पालटतें. तो जरी पहिल्यानें वाघासारखा क्रूर असला तरी मेंढरासारखा नम्र होतो, व त्याच्या आत्म्याची काया खरोखर बदलती. त्याची कोळशासारखी काळी बुद्धि पालटून बर्फासारखी शुभ्र होती. तुह्मी ह्या गोष्टीचा अनुभव घ्या. वारीचें वेड सोडा, दग-

डाचे व सोन्यारुप्याचे देव ह्मणजे निर्जीव मूर्ति टाकून द्या, व येशू ख्रीस्ताच्या नांवानें परमेश्वराला शरण जा, ह्मणजे तुह्माला खरी शांति मिळेल, आणि इहलोकीं व परलोकीं सुखी व्हाल.

आतां मी तुमचा निरोप घेतों. जें आपलें संभाषण झालें तें विसरूं नका, एथून परत जाल तेव्हां मार्गांत त्याचा विचार करा. परमेश्वर तुह्माला आशीर्वाद देवो व तुमचें व तुमच्या कुटुंबांचें व देशाचें कल्याण करो.

---

**ख्रीस्त जीवनदाता.** (हिंदुस्थानी भजन.)

ध्रु० यीशु मसीह । मेरो प्राण बचैया ॥
१ जो पापी यीशूक ने आवे ।
यीशु है वाकी मुक्ति करै या ॥
२ यीशु मसीहकी मै बलि बलि जैहूं ।
यीशु है मेरो त्राण करै या ॥
३ गहिरि वह नदिया नांव पुराणी ।
यीशु है मेरो पार करै या ॥
४ दीन नाथ अनाथ के बन्धू ।
तुमही हो प्रभु पाप हरै या ॥
५ आसीको अपनी शरण मे राखियो ।
अंत समै मेरी लीजे खबरी या ॥

---